# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. १२५ /२०१८**

एम.फिल./पीएच.डी. पदवी प्रदान करण्यासंदर्भातील नियमावली दि. ५ मे, २०१६ रोजी प्रसिद्ध झालेल्या भारतीय राजपत्रामध्ये नमूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ हा दि. १ मार्च, २०१७ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३४ (२) मध्ये खालील ४ विद्याशाखांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे :

१) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
२) मानवविज्ञान विद्याशाखा
३) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
४) आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

भारतीय राजपत्रातील क्र. ६.५ मध्ये एका एम.फिल./पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकाकडे जास्तीत जास्त किती विद्यार्थी नावनोंदणी करू शकतात याचाही उल्लेख करण्यात आलेला आहे.

उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करून एका एम.फिल./पीएच.डी. संशोधन मार्गदर्शकास एका विद्याशाखेमध्ये किती विषयांमध्ये मार्गदर्शन करता येईल, यासंदर्भात दि. ७ जून, २०१८ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

> असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठाच्या विभागांमधील अध्यापकांना एका विद्याशाखेमधील जास्तीत जास्त २ विषयांमध्ये एम. फिल व पीएच. डी. संशोधन मार्गदर्शक (M.Phil / Ph.D Research Guide) म्हणून मान्यता देण्यात यावी.
>
> तथापि, ज्या एम. फिल व पीएच. डी. संशोधन मार्गदर्शकांना यापूर्वीच ३ विषयांना दिलेली मान्यता ज्या कालावधीपर्यंत देण्यात आलेली आहे तोपर्यंतच लागू राहील. २ विषयांपेक्षा जास्त विषयांसाठी एम. फिल व पीएच. डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून अर्ज करावयाचा असल्यास अशा अर्जांवर विचार करून अर्ज स्वीकारण्याबाबत निर्णय घेण्याबाबतचे अधिकार मा. प्र–कुलगुरू, अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळ यांना देण्यात येत आहेत.

कृपया मागे पहावे....

तरी विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा.क्र. आरआर ७५१/२०१८ )
दिनांक : १८ जुलै, २०१८ )

१८/७/१८

उपकुलसचिव
( शैक्षणिक विभाग )

प्रति :
१) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
३) मा. संचालक, सर्व विद्यापीठ मान्यताप्राप्त परिसंस्था.
४) मा. संचालक, सर्व विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन संस्था.

प्रत माहितीसाठी :
१) मा. प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
४) उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
५) सहाय्यक कुलसचिव, मा. कुलगुरू कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.